RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक १५] सोमवार, मे ५ , २०२५/वैशाख १५, शके १९४७ [पृष्ठे ४९ किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ मे २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५.**

क्रमांकःरानिआ/रापनों/२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि. ५ मे २०२५.

**संदर्भ :**

(१) राजकीय पक्षांचा निवडणूक खर्चः क्रमांक- रानिआ/मनपा.२००६/प्र.क्र.१७/का.५, ३० डिसेंबर २००६.

(२) राजकीय पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवारः क्रमांक-रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१९/का-५, दि. ६ जानेवारी २००७.

(३) राजकीय पक्ष नोंदणी आदेशः क्रमांक-एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. ३१ मार्च २००९.

(४) महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेशः क्रमांक- एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. ३१ मार्च २००९.

(५) नोंदणी प्रक्रिया शुल्कात वाढः क्रमांक- एसईसी/२००९/सीआर-४९/का.११, दि. २ सप्टेंबर २००९.

(६) प्रमुख प्रचारकांबाबत : क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/ का-५, दि. ८ नोव्हेंबर २०११.

(७) बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार होणाऱ्या निवडणुकांत अमान्यताप्राप्त पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटपाबाबतः क्रमांक-एसईसी-२००९/प्र.क्र.४९/का.११, दि. ४ फेब्रुवारी २०१२.

(८) उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांकडून नामनिर्देशनपत्र दाखल केले असल्यासः क्रमांक-एसईसी-२००९/प्र.क्र.४९/का.११, दि. ५ फेब्रुवारी २०१२.

(९) महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत निवडणूक जोडपत्र १ व २ विहित करणेः क्रमांक- रानिआ/ रापनो/२००९/प्र.क्र.४९(भाग२)/ का-११, दि. २५ फेब्रुवारी २०१३.

(१०) राजकीय पक्ष व मुक्त चिन्हांबाबतः क्रमांक- रानिआ./रापनों-२०१५/प्र.क्र.६/का.११, दि. ८ मे २०१५.

(११) नोंदणी रद्द झालेल्या राजकीय पक्षांची नोंदणी पूर्ववत करण्याबाबतः क्रमांक- रानिआ/रापनों- २०१६/ प्र.क्र. ६८/ का- ११, दि. २६ ऑगस्ट २०१६.

(१२) नगरपरिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जोडपत्र ३ व ४ विहित करणेः क्रमांक- रानिआ/ रापनो- २०१६/प्र.क्र.८४/ का.११, दि. १९ ऑक्टोबर २०१६.

(१३) कायम नोंदणी क्रमांकाबाबतः रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.४/का-११, दि. १७ जानेवारी २०१७.

(१४) महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) (सुधारित) आदेशः क्रमांक- एसईसी/आरपीपी-२०१७/सीआर-०७/ का.११, दि. २१ जानेवारी २०१७.

(१५) उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची सूचना कळविण्याबाबतः क्रमांक- रानिआ/ मनपा-२०१५/ प्र.क्र.१३/का- ५, दि. १ फेब्रुवारी २०१७.

(१६) नगरपंचायत अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकांसाठी जोडपत्र- १ व २ विहित करण्याबाबत आदेशः क्रमांक-रानिआ/रापनों- २०१६/प्र.क्र.८४/का.११, दि. १७ नोव्हेंबर २०१७.

(१७) राजकीय पक्षाची नोंदणी आदेश २००९ (सुधारित २०१८) : क्रमांक- रानिआ/ रापनों. २०१८/प्र.क्र.८/ का.११, दि. २६ जुलै २०१८.

(१८) राजकीय पक्षांसाठी सूचनाः क्रमांक- रानिआ/रापनों-२०२०/प्र.क्र.१/का.११, दि. ०९ जानेवारी २०२०.

(१९) राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ (पुनःसुधारित २०२२): क्रमांक- रानिआ/ रापनों-२०२२/ प्र.क्र.२०/ का.११, दि. १५ फेब्रुवारी २०२२.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ ट' (२४३K) आणि '२४३ यक' (२४३ZA) अन्वये; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यांतील तरतुदींन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले आहेत;

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ५७५६/२००५, श्री किसनसिंग तोमर वि. अहमदाबाद महानगरपालिका व इतर मध्ये दि. १९ ऑक्टोबर २००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व जबाबदाऱ्या भारत निवडणूक आयोगाशी समतुल्य आहेत, असे नमूद करण्यात आलेले आहे;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक, निःपक्षपातीपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांची नोंदणी व संबंधित बाबींची तरतूद करणे आवश्यक झाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने सर्वप्रथम 'राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००४' दि. २० नोव्हेंबर २००४' रोजी निर्गमित केला होता. तेव्हापासून राज्य निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षांची नोंदणी केली जात आहे; परंतु तो आदेश अधिक्रमित करून 'राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९' (वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे) आणि 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९' दि. ३१ मार्च २००९' रोजी आदेश निर्गमित करण्यात आला आहे;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष व उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबतचे विविध आदेश अधिक्रमित करून राज्य निवडणूक आयोगाने दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी एकत्रित आदेश {रानिआ-२०२३/उनिख/प्र. क्र.१३/संगणकीकरण कक्ष(ब)} निर्गमित केला आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त संदर्भांकित आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. या आदेशांची अंमलबजावणी करताना होणारा संभ्रम दूर करणे, आदेशांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता आणणे इत्यादी बाबी विचारात घेऊन 'राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९' (वेळोवेळी सुधारित केल्यानुसार) आणि 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९' (वेळोवेळी सुधारित केल्यानुसार) मध्ये काही सुधारणा करणे व सुलभता आणणे आवश्यक आहे, अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे;

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद- २४३ट व २४३यक; मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम १८अ(४); महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४); महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०-अ (४); महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ; महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ(४) अन्वये; तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र उपरोक्त संदर्भांकित सर्व आदेश अधिक्रमित करून खालीलप्रमाणे आदेश देत आहेः

## आदेश

## भाग एक
## आदेशाचे नाव आणि व्याप्ती

**१. नाव, व्याप्ती आणि प्रारंभः**

( १ ) या आदेशाला 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५' असे म्हटले जाईल.

( २ ) महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष, मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष, मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष, इतर राज्यातील राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष इ. राजकीय पक्षांनादेखील राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

( ३ ) या आदेशाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर राहील.

( ४ ) हा आदेश, राजकीय पक्षाच्या आधारावर घेतल्या जाणाऱ्या राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता लागू राहील. ग्रामपंचायतींच्या निवडणुका पक्षविरहित घेतल्या जात असल्याने त्यांना हा आदेश केवळ परिच्छेद २३( १ )( ङ ) नुसार प्रसिद्ध होणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीपुरता लागू राहील.

( ५ ) हा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल.

( ६ ) हा आदेश अंमलात येण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेल्या सर्व राजकीय पक्षांची नोंदणी या आदेशानुसार झाल्याचे समजण्यात येईल.

## भाग दोन
## व्याख्या

**२. व्याख्याः या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,**

( १ ) **'आयोग'** म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ ट' व '२४३ यक' अन्वये गठित राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

( २ ) **चिन्ह–**

**(क)** **'आरक्षित चिन्हे'** म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यानंतर त्या पक्षासाठी भारत निवडणूक आयोगाने आरक्षित केलेले चिन्ह राज्य निवडणूक आयोगाकडून या आदेशातील तरतुदींनुसार आरक्षित केलेल चिन्ह.

**(ख)** **'मुक्त चिन्ह'** म्हणजे नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठीच्या आरक्षित चिन्हांव्यतिरिक्त राज्य निवडणूक आयोगाने या आदेशातील परिच्छेद २३( १ )( ङ ) नुसार प्रसिद्ध केलेली चिन्हे.

**(ग)** **'तात्पुरते आरक्षित चिन्ह'** या आदेशातील परिच्छेद १७ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या, राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाला त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जाहीर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुक्त चिन्हांपैकी तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित केलेले एक समान चिन्ह.

( ३ ) **निवडणुका–**

( क ) **'निवडणूक'** म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक किंवा पोटनिवडणूक.

( ख ) **'निर्वाचन क्षेत्र'** म्हणजे जिल्हा परिषदेचा निवडणूक विभाग, पंचायत समितीचा निर्वाचक गण, महानगरपालिका, नगरपरिषद वा नगरपंचायत, ग्रामपंचायतींचा प्रभाग अथवा यथास्थिती सरपंचपदाची थेट निवडणूक/ नगरपरिषद वा नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाची थेट निवडणूक/ महापौरपदाच्या थेट निवडणुकीसाठीचे अनुक्रमे त्या-त्या ग्रामपंचायत/ नगरपरिषद/ नगरपंचायत/ महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र.

(ग) **‘लढविण्यात येणारी निवडणूक’** म्हणजे ज्या निवडणुकीत जिल्हा परिषदेचा निवडणूक विभाग, पंचायत समितीचा निर्वाचक गण आणि महानगरपालिका, नगरपरिषद/ नगरपंचायत किंवा ग्रामपंचायतींचा प्रभाग जेथे सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकांसाठी मतदान घेण्यात येते अशी निवडणूक. यात यथास्थिती सरपंचपदाची थेट निवडणूक/ नगरपरिषद वा नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाची थेट निवडणूक/ महापौरपदाची थेट सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकांचाही समावेश होतो.

(४) **‘परिच्छेद’** म्हणजे ‘महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५’ या आदेशातील परिच्छेद.

(५) **‘भारत निवडणूक आयोग’** म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये गठित भारत निवडणूक आयोग.

(६) **राजकीय पक्ष–**

(क) **‘प्रस्तावित राजकीय पक्ष’** म्हणजे या आदेशाच्या प्रयोजनार्थ राज्य निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्ष म्हणून नोंदणीसाठी ज्या राजकीय पक्षाने (यामध्ये भारत निवडणूक आयोगाकडे पूर्वीच नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष, मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष, मान्यताप्राप्त राज्यस्तरीय राजकीय पक्ष आणि मान्यताप्राप्त इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष यांचाही समावेश होतो) अर्ज दाखल केला आहे व तो विचाराधीन आहे; परंतु नोंदणीबाबत अंतिम निर्णय न झालेला राजकीय पक्ष.

(ख) **‘राजकीय पक्ष’** म्हणजे ‘महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५’ या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेला राजकीय पक्ष.

(ग) **‘नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष’** म्हणजे i) भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत; परंतु निवडणूक चिन्ह आरक्षित नसलेला तथापि राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे नोंदणी झालेला राजकीय पक्ष, ii) भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणी नसलेला; परंतु राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे नोंदणी झालेला राजकीय पक्ष.

(घ) **‘नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष’** म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडून राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय राजकीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त आणि राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे नोंदणी झालेला राष्ट्रीय पक्ष किंवा महाराष्ट्रातील राज्यस्तरीय राजकीय पक्ष.

(ङ) **‘इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष’** म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्यात राज्यस्तरीय मान्यता प्राप्त व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे नोंदणी झालेला राजकीय पक्ष.

(७) **‘राज्य’** म्हणजे महाराष्ट्र राज्य.

(८) **‘सोडत पद्धत’** म्हणजे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना किंवा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना चिन्ह वाटपासाठी गरजेनुसार राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवारांच्या नावाच्या चिठ्ठ्या संबंधित उमेदवार किंवा त्याचे प्रतिनिधी/ संबंधित पक्षांचे पदाधिकारी/ प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत टाकून, ज्या राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल, त्यास संबंधित निवडणूक चिन्हाचे वाटप करण्याची प्रक्रिया. सोडतीच्या वेळी व ठिकाणी, उमेदवार/ राजकीय पक्ष अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास ३० मिनिटानंतर तिथेच सोडत काढली जाईल, या प्रक्रियेचाही या व्याख्येत समावेश असेल.

(९) **‘स्थानिक स्वराज्य संस्था’** म्हणजे—

(क) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम अन्वये गठित ग्रामपंचायत किंवा,

(ख) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये गठित जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती किंवा,

(ग) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठित नगरपरिषदा, नगरपंचायती अथवा औद्योगिक नगरी किंवा,

(घ) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अन्वये गठित महानगरपालिका.

(१०) सदर आदेशात वापरलेले; परंतु व्याख्या न केलेले शब्द व वाक्यप्रयोग यांना राज्यातील सध्या अस्तित्वात असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित अधिनियमांत किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांद्वारे जे अर्थ दिले असतील तेच अर्थ प्राप्त होतील, अन्य कोणताही नाही.

## भाग तीन
## राजकीय पक्ष नोंदणी

**३. राजकीय पक्ष नोंदणीसाठी अर्जः**

(१) ज्या प्रस्तावित राजकीय पक्षाला, या आदेशाच्या तरतुदींचा लाभ घ्यावयाचा आहे तो पक्ष, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ग्रामपंचायत वगळता) निवडणुकांच्या प्रयोजनाकरिता राजकीय पक्ष म्हणून नोंदणीसाठी स्वतःहून पुढील विहित पद्धतीने अर्ज करील.

(क) भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष, मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष, मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष आणि इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष स्वतःहून 'परिशिष्ट- १' प्रमाणे अर्ज करेल. (कृपया परिच्छेद ३(५)(झ) चे परंतुक पाहावे)

(ख) भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणी नसलेला पक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्यासाठी 'परिशिष्ट-२' प्रमाणे अर्ज करेल.

(ग) पक्ष नोंदणीसाठीचा अर्ज 'सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र', यांच्या नावे असावा. तो अर्ज प्रत्यक्ष किंवा नोंदणीकृत टपालाने राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे थेट सादर करता येईल किंवा संगणकीय प्रणालीची (ऑनलाईन) सुविधा उपलब्ध असल्यास आणि तसे निर्देश आयोगाने दिल्यास त्या पद्धतीने सादर करता येईल.

(घ) पक्ष नोंदणीसाठी प्राप्त झालेला अर्ज किंवा त्यासोबतची कागदपत्रे आवश्यकतेनुसार पडताळणीसाठी संबंधित राजकीय पक्षाचे मुख्यालय असलेल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे अथवा यथास्थिती संबंधित महानगरपालिका आयुक्तांकडे पाठविण्याचा निर्णय आयोग घेऊ शकेल.

(ङ) वरीलप्रमाणे अर्ज जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आला असल्यास, संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त आयोगाच्या सूचनेप्रमाणे अर्जातील माहिती आणि कागदपत्रांची यथायोग्य पडताळणी करून आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तो अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करतील.

(२) राजकीय पक्ष नोंदणीकरिता अर्ज सादर करताना प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव हे यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविलेल्या राजकीय पक्षाच्या नावासारखे किंवा नोंदणी रद्द केलेल्या राजकीय पक्षाच्या नावासारखे असू नये.

(३) सर्व प्रस्तावित राजकीय पक्षांना नोंदणी अर्जासोबत 'परिशिष्ट- ३' नुसार नोटराईज्ड घोषणापत्र देणे बंधनकारक असेल.

(४) परिच्छेद ३(१) अन्वये करावयाच्या अर्जावर व परिच्छेद ३(३) अन्वये द्यावयाच्या घोषणापत्रावर प्रस्तावित राजकीय पक्षाचे प्रदेश/ राष्ट्रीय अध्यक्ष किंवा सचिव/ सरचिटणीस यांची स्वाक्षरी असेल.

(५) नोंदणी अर्जात खालील तपशील व सोबत समर्थनीय दस्तऐवज सादर करणे आवश्यक राहील—

(क) प्रस्तावित राजकीय पक्षाची घटना (अशा घटनेत पक्षाचे नाव नमूद असेल).

(ख) प्रस्तावित राजकीय पक्षाच्या स्थापनेच्या ठरावाचा दिनांक व त्याची प्रत.

(ग) प्रस्तावित राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता.

(घ) प्रस्तावित राजकीय पक्षाचे राज्यातील मुख्य कार्यालय ज्या ठिकाणी/ इमारतीमध्ये असेल, त्या ठिकाणच्या/ इमारतीच्या मालकाचे संबंधित राजकीय पक्षास ते ठिकाण/ इमारत मुख्य कार्यालयासाठी वापरण्यास हरकत नसल्याचे नोटराईज्ड केलेले परिशिष्ट ४ प्रमाणे 'ना हरकत प्रमाणपत्र'; तसेच संबंधित ठिकाण/ इमारतीच्या मालकाच्या नावाचे चालू आर्थिक वर्षातील संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मिळकत कराचे देयक किंवा मिळकतीची अन्य कागदपत्रे अथवा नोंदणीकृत खरेदीखत किंवा अधिकार अभिलेख (उदा. मिळकत पत्रिका इ.) यापैकी कोणताही एक स्वसाक्षांकित केलेला पुरावा.

(ङ) प्रस्तावित राजकीय पक्षाचे राज्यातील मुख्य कार्यालय ज्या ठिकाणी/ इमारतीमध्ये सुरू करायचे आहे किंवा केलेले आहे ते ठिकाण/ इमारत ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये येते, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' (परिशिष्ट- ५ प्रमाणे).

(च) प्रस्तावित राजकीय पक्ष स्थापनेचा ठराव, पक्षाच्या मुख्य किंवा राज्य कार्यकारणीच्या (अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव/ सरचिटणीस, कोषाध्यक्ष/ खजिनदार व इतर पदाधिकारी) निवडीचा ठराव, पक्षाची घटना मंजूर/ स्वीकारण्यात आल्याचा ठराव इ. ठरावांची नोटराईज्ड प्रत.

(छ) प्रस्तावित राजकीय पक्ष भारत निवडणूक आयोगाकडील राष्ट्रीय, राज्यस्तरीय किंवा इतर राज्यातील राज्यस्तरीय मान्यताप्राप्त राजकीय पक्ष असल्यास, अशा पक्षाच्या राज्यस्तरीय पदाधिकारी/ कार्यकारिणी सदस्यांची नियुक्ती राष्ट्रीय कार्यकारीणीने केली असल्यास त्याबाबतच्या नियुक्तीच्या पत्राची किंवा निवडीबाबतच्या ठरावाची नोटराईज्ड प्रत.

(ज) भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी झाली असल्यास राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी अर्ज सादर करताना भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्याचा पुरावा, मान्यताप्राप्त असल्यास निवडणूक चिन्हांचा तपशील (चिन्हाच्या चित्रासह) आणि वरील परिच्छेद ३(५)(घ) आणि ३(ड) मध्ये नमूद कागदपत्रांसह.

(झ) प्रस्तावित राजकीय पक्षाच्या सदस्यांचे संख्याबळ किमान १५० (पक्षाचे कार्यकारिणी/ पदाधिकाऱ्यांसह) असणे आवश्यक. ते सर्व महाराष्ट्र राज्यातील रहिवासी व त्यांची नावे भारत निवडणूक आयोगाने अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघाच्या अद्ययावत मतदार यादीत असणे आवश्यक. त्या सर्व सदस्यांची नावे व त्यांचा मतदार यादीतील तपशील (उतारा) संबंधित मतदार नोंदणी अधिकारी/ तहसील कार्यालय यांच्याकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. मतदार ओळखपत्रावरील ओळखपत्र क्रमांक आणि मतदार यादीतील ओळखपत्र क्रमांक समान असावा. इतर राज्यातील राज्यस्तरीय राजकीय पक्षांनादेखील या तरतुदीनुसार कार्यवाही करावी लागेल.

परंतु, भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांना सदर अट लागू राहणार नाही.

(ञ) प्रस्तावित राजकीय पक्षाचे सर्व पदाधिकारी/ सदस्यांचे विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीतील नाव, विधानसभा मतदारसंघाचा अनुक्रमांक, विधानसभा मतदारसंघाचे नाव, यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक हा तपशील (परिशिष्ट- ६ प्रमाणे).

(ट) प्रस्तावित राजकीय पक्षाचे सर्व पदाधिकारी/ सदस्याच्या (किमान १५०) मतदार ओळखपत्राची स्वसाक्षांकित प्रत. (मतदार ओळखपत्राच्या पुढील व मागील या दोन्ही बाजूचे झेरॉक्स एकाच पृष्ठावर असावे.) इतर राज्यातील राज्यस्तरीय राजकीय पक्षांनादेखील या तरतुदीनुसार कार्यवाही करावी लागेल.

परंतु, भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांना सदर अट लागू राहणार नाही.

(ठ) प्रस्तावित राजकीय पक्षाचे सदस्य/ पदाधिकारी अन्य कुठल्याही राजकीय पक्षाचे पदाधिकारी किंवा सदस्य नसल्यासंदर्भातील व इतर बाबींविषयीचे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट- ७ प्रमाणे).

(ड) प्रस्तावित राजकीय पक्षाच्या राज्य कार्यकारिणी/ पदाधिकारी यांच्या नावांची स्वाक्षरीसह यादी (परिशिष्ट- ८ प्रमाणे).

(ढ) परिशिष्ट- ११ प्रमाणे भरलेली तपासणी सूची.

**४. राजकीय पक्षाच्या घटनेत खालील तरतुदी करणे आवश्यकः**

(१) प्रस्तावित राजकीय पक्षाचा भारतीय संविधानावर दृढ विश्वास व निष्ठा आहे; तसेच भारताचे सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, गणराज्य, एकता व एकात्मता पक्षास मान्य असल्याची तरतूद.

(२) पक्षाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व कार्यकारिणीच्या इतर पदाधिकारी/ सदस्य यांची निवड पक्षाच्या सदस्यांतून व पक्षाच्या सदस्यांकडून लोकशाही पद्धतीने निवडणूक घेऊन जास्तीत जास्त पाच वर्षांकरिता केली जाईल आणि कार्यकारिणीची मुदत संपण्यापूर्वी नवीन कार्यकारिणीसाठी निवडणूक घेण्याबाबतची तरतूद.

(३) राजकीय पक्षांतर्गत वाद लोकशाही पद्धतीने मिटविण्यासंदर्भातील तरतूद आणि कार्यपद्धती स्पष्टपणे नमूद असेल.

(४) पक्षाच्या वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची (Audited Accounts) एक प्रत व कायद्यान्वये भरलेल्या संबंधित वर्षातील आयकर विवरण पत्राची (रिटर्नची) एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यापासून ७ महिन्यांच्या आत आयोगाच्या कार्यालयास देण्याबाबतची तरतूद.

(५) राजकीय पक्ष नोंदणीनंतर पक्षाच्या वार्षिक/ विशेष/ सर्वसाधारण सभेत दोन तृतीयांश बहुमताद्वारेच पक्षाची घटनादुरुस्ती करता येईल व त्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिया पक्षाच्या घटनेत विशद करावी. पक्षाच्या नोंदणीनंतर त्यानुसार केलेली घटना दुरूस्तीच वैध मानली जाईल. अशा पद्धतीने मंजूर केलेला घटनादुरुस्तीचा ठराव नोटराईज्ड करून राज्य निवडणूक आयोगास विनाविलंब सादर करावा.

(६) प्रस्तावित पक्षाच्या घटनेच्या प्रत्येक पृष्ठावर अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव/ सरचिटणीस, कोषाध्यक्ष/ खजिनदार यांच्यासह एकूण पाच पदाधिकारी/ कार्यकारिणी सदस्य यांची पदनामासह स्वाक्षरी असेल.

(७) राजकीय पक्षाची घटना तयार करण्यासाठी 'परिशिष्ट- ९' मध्ये मार्गदर्शक तत्वे दिली असून, त्यानुसार परिपूर्ण कार्यवाही करावी.

**५. सर्वसाधारण सूचनाः**

(१) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीसाठी अर्ज दाखल करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी झालेल्या आणि नोंदणी रद्द झालेल्या राजकीय पक्षाच्या नावांची यादी (आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध) प्रस्तावित राजकीय पक्ष यांनी पडताळून घ्यावी. प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव या याद्यांतील नावांशी साधर्म्य असलेले नसेल, याची दक्षता घ्यावी.

(२) प्रस्तावित राजकीय पक्षांनी नोंदणीसाठी अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे दाखल करताना ते टंकलिखित व सुस्पष्ट मुद्रित (प्रिंट) केलेले असावेत. प्रत्येक पृष्ठाला क्रमांक हवा. प्रस्तावासोबत परिशिष्ट ११ मध्ये नमूद तपासणी सूचीतील क्रमानुसार सर्व कागदपत्रे जोडावीत.

(३) पक्ष नोंदणी अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर, संपर्क क्रमांवर किंवा ई-मेल आयडीवरच राज्य निवडणूक आयोगाकडून भविष्यात संपर्क केला जाईल. ई-मेल आयडी पक्षाच्या नावाचाच (पक्षाचे नाव संक्षिप्त स्वरुपात वापरले तरी चालेल) असावा.

(४) राजकीय पक्षांची नोंदणी झाल्यानंतर त्यांच्याकडून प्राप्त झालेली सर्व माहिती व कागदपत्रे सार्वजनिक स्वरुपाची असल्याचे गृहित असेल. त्याचबरोबर ती माहिती किंवा कागदपत्रे राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर तशी सुविधा असल्यास किंवा तशी सुविधा नंतर उपलब्ध झाल्यास प्रसिद्ध (अपलोड) केली जातील.

(५) प्रस्तावित राजकीय पक्षांकडून नोंदणीच्या दृष्टीने आवश्यक वाटेल अशा स्वरूपाचा इतर तपशीलदेखील राज्य निवडणूक आयोग अर्जासोबत मागवू शकेल.

(६) राजकीय पक्ष नोंदणीसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी हा संपूर्ण आदेश वाचणे आवश्यक आहे. अर्जदार व प्रस्तावित पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तो वाचला असल्याचे समजण्यात येईल.

(७) राज्य निवडणूक आयोग राजकीय पक्षांच्या ध्वजास मान्यता देत नाही. जर राजकीय पक्षाचा ध्वज असल्यास ती त्या पक्षाची जबाबदारी असेल.

**६ प्रक्रिया शुल्कः**

(१) राजकीय पक्ष नोंदणीच्या अर्जासोबत 'सहायक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई.' (Assistant Commissioner, State Election Commission, Maharashtra, Mumbai) यांच्या नावे रु.२०,००० (रूपये वीस हजार फक्त) चा मुंबई येथे देय असलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) देणे आवश्यक आहे किंवा उपलब्ध सुविधेनुसार ऑनलाईन पद्धतीनेदेखील प्रक्रिया शुल्क भरता येईल.

(२) राजकीय पक्ष नोंदणीचा अर्ज निकाली काढण्यात आला किंवा कोणत्याही कारणास्तव नोंदणी होऊ शकली नाही; तसेच नोंदणी झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नोंदणी रद्द झाली किंवा तो पक्ष विसर्जित झाला अथवा अन्य राजकीय पक्षात विलिन झाला तरीही त्या पक्षाने पक्ष नोंदणीसाठी जमा केलेले प्रक्रिया शुल्क त्यांना परत मिळणार नाही.

**७. प्राप्त अर्जावरील कार्यवाही आणि पक्षाने प्रसिद्ध करावयाची जाहिरातः**

(१) राज्य निवडणूक आयोगास राजकीय पक्ष नोंदणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, तो अर्ज या आदेशातील तरतुदींनुसार परिपूर्ण असल्यास आयोगाकडून राजकीय पक्ष नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

(२) या आदेशान्वये राजकीय पक्षाची नोंदणी करण्यापूर्वी **महाराष्ट्र शासन राजपत्रात** पक्षाचे नाव, पत्ता व त्याचे अध्यक्ष, सचिव/ सरचिटणीस, कोषाध्यक्ष/ खजिनदार यांच्या नावाचा व पक्षाच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्याचा अंतर्भाव असलेली पूर्वसूचना प्रसिद्ध करण्यात येईल आणि सर्वसाधारण जनतेकडून अशा नोंदणीबाबतच्या हरकती व सूचना मागविण्यात येतील.

परंतु, भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या बाबतीत अशी पूर्वसूचना प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) राजकीय पक्षाच्या नोंदणीसंदर्भातील पूर्वसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यानंतर १० दिवसांच्या आत प्रस्तावित राजकीय पक्षाने त्यांचे मुख्यालय असलेल्या जिल्ह्यातील एका मराठी वृत्तपत्रात त्यांच्या स्तरावरून 'परिशिष्ट- १०' प्रमाणे **जाहिरात ठळकपणे प्रसिद्ध करावी**. सदर जाहिरात राज्य शासनाच्या वृत्तपत्रांच्या यादीतील 'अ' किंवा 'ब' वर्गात समावेश असलेल्या वृत्तपत्रातच प्रसिद्ध करावी. जाहिरात प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्राच्या संबंधित अंकाची मूळ प्रत व त्या वृत्तपत्राचा वर्ग नमूद असलेले शासनाचे पत्र/ प्रमाणपत्र/ शासन निर्णय (राजकीय पक्षाने संबंधित वृत्तपत्राकडून प्राप्त करून घ्यावे) आयोगाच्या कार्यालयास जाहिरात प्रसिद्धीनंतर ७ दिवसांच्या आत सादर करावे.

परंतु, भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या बाबतीत अशी जाहिरात प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही.

(४) पूर्वसूचना आणि जाहिरात प्रसिद्धीनंतर,

(क) वरील परिच्छेद ७(२) आणि ७(३) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार अनुक्रमे **महाराष्ट्र शासन राजपत्रात** पूर्वसूचना प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत आणि वृत्तपत्रांत जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या २० दिवसांपर्यंत (यापैकी जी तारीख नंतर असेल, त्या तारखेपर्यंत) कोणतीही हरकत किंवा सूचना प्राप्त न झाल्यास, राज्य निवडणूक आयोग पूर्वसूचनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावित राजकीय पक्षाची नोंदणी करण्याकरिता सक्षम राहील.

(ख) विहित कालावधीत जर कोणतीही हरकत किंवा सूचना प्राप्त झाली, तर तिचा राज्य निवडणूक आयोगाकडून योग्य विचार केला जाईल. विचाराअंती ती अदखलपात्र आढळल्यास फेटाळण्यात येईल व प्रस्तावित राजकीय पक्षाची नोंदणी करण्यात येईल. मात्र जर कोणतीही हरकत किंवा सूचना प्रथमदर्शनी सत्य वाटली, तर त्याबाबत प्रस्तावित राजकीय पक्षाच्या अर्जदारास कळविण्यात येईल आणि त्यावर त्याचे अभिप्राय मागविण्यात येतील किंवा आयोगास वाटल्यास आवश्यकतेप्रमाणे सुनावणी घेण्यात येईल. अभिप्राय प्राप्त झाल्यावर किंवा सुनावणीनंतर गुणवत्तेच्या आधारे आयोग उचित निर्णय घेईल व हा निर्णय अंतिम राहील.

(ग) प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव हे यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविलेल्या राजकीय पक्षाच्या नावासारखे, राज्य निवडणूक आयोगाने नोंदणी रद्द केलेल्या पक्षाच्या नावासारखे, जनतेच्या मनात त्याबाबत संभ्रम निर्माण करण्यासारखे आढळल्यास अथवा सर्वसाधारण जनतेकडून तशा हरकती, सूचना आल्यास व पडताळणीत तसे सिद्ध झाल्यास आयोग स्वतःच्या अधिकारात प्रस्तावित राजकीय पक्षाचा नोंदणी अर्ज नाकारण्यास सक्षम राहील.

परंतु, प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव अन्य राजकीय पक्षाच्या नावाशी साधर्म्य आढळल्यास, अशा प्रस्तावित राजकीय पक्षास नवीन नावाची निवड करून आवश्यक त्या कागदपत्रांसह पुन्हा अर्ज सादर करता येईल. असा अर्ज नवीन अर्ज म्हणून नव्याने पुन्हा तपासण्यात येईल; परंतु जर संबंधित प्रस्तावित राजकीय पक्षाने प्रक्रिया शुल्क यापूर्वी भरले असल्यास ते पुन्हा भरण्याची आवश्यकता असणार नाही. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

(५) उक्त सर्व तपशिलांचा; तसेच इतर आवश्यक व संबंधित बाबींचा विचार करून, राज्य निवडणूक आयोग या आदेशाच्या प्रयोजनार्थ प्रस्तावित राजकीय पक्ष, यांना 'राजकीय पक्ष' म्हणून काही मर्यादा व अटी पाळण्याचे आदेश देऊन त्यांची नोंदणी करेल किंवा परिपूर्ण अर्जाच्या अभावी त्यांची नोंदणी करणार नाही, असा निर्णय त्यांना राज्य निवडणूक आयोगाकडून लेखी स्वरूपात कळविला जाईल.

परंतु, असे की, परिच्छेद ४ मधील तरतुदींशी राजकीय पक्षाची घटना जुळत नसल्यास राज्य निवडणूक आयोगाकडे प्रस्तावित राजकीय पक्षाची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी केली जाणार नाही.

(६) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी होणाऱ्या राजकीय पक्षांना कायम स्वरुपी नोंदणी क्रमांक (Permanent Registration Number- PRN) देण्यात येईल. या क्रमांकात पाच बाबींचा समावेश असेल. सुरुवातीला SEC (राज्य निवडणूक आयोग) असेल. नंतर राजकीय पक्षाच्या वर्गवारीनुसार संक्षिप्त स्वरुपात NP (राष्ट्रीय पक्ष)/ SP (राज्यस्तरीय पक्ष)/ OSP (इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष)/ UPP (राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष) असेल. त्यानंतर पक्षाच्या नावातील शब्दांची लघुरुपे (राज्य निवडणूक आयोग ठरवेल त्याप्रमाणे) असतील. त्यानंतर पक्षाचे नोंदणीचे वर्षे आणि त्या नोंदणी वर्षातील पक्षाचा अनुक्रमांक असेल. उदा. SEC/ UPP/XYZ/२०२५/०१.

८. **राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाल्यानंतर करावयाची पूर्तता**

(१) राजकीय पक्षाची नोंदणी झाल्यानंतर ६ महिन्यांच्या आत त्या पक्षाने पक्षाच्या नावे उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्याचा तपशील आणि पक्षाच्या नावे आयकर विभागाकडून प्राप्त पॅन (PAN) कार्डची स्वसाक्षांकित प्रत आयोगास सादर करावी लागेल.

(२) राजकीय पक्षाने त्यांची मिळकत व खर्च यांचे हिशोब इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्न्स ऑफ इंडिया यांनी निश्चित केलेल्या निकषानुसार व रितीने ठेवावेत. (अधिक माहितीसाठी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्न्स ऑफ इंडियाचे संकेतस्थळ www.icai.org)

(३) राजकीय पक्षाने वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची (Audited Accounts) एक प्रत आणि संबंधित वित्तीय वर्षात भरलेल्या आयकर विवरणपत्राची (रिटर्नची) एक प्रत वित्तीय वर्ष संपल्यापासून ७ महिन्यांच्या आत आयोगाच्या कार्यालयात दरवर्षी नियमितपणे सादर करावी. संबंधित आर्थिक वर्षात कुठलाही आर्थिक व्यवहार झाला नसला तरीही निरंक म्हणून वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची प्रत आणि निरंक म्हणून भरलेल्या आयकर विवरण पत्राची (रिटर्नची) प्रत देणे बंधनकारक आहे.

(४) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आयोगाकडून वेळावेळी निर्गमित करण्यात आलेल्या/ येणाऱ्या आदर्श आचारसंहितेमधील तरतुदींचे पालन करणे राजकीय पक्षास बंधनकारक असेल.

(५) सर्वसाधारण जनतेच्या व प्रामुख्याने मतदारांच्या हिताच्यादृष्टीने किंवा निवडणुका मुक्त, पारदर्शक व शांततापूर्ण वातावरणात निःपक्षपातीपणे पार पाडण्यासाठी आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन करणे राजकीय पक्षास बंधनकारक असेल.

(६) या आदेशाच्या दिनांकापूर्वी नोंदणी झालेल्या राजकीय पक्षांकडून सदर आदेशाच्या दिनांकापासून पुढील ५ वर्षांच्या कालावधीत राज्यात होणाऱ्या कोणत्याही एका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ग्रामपंचायत वगळून) सार्वत्रिक निवडणुकीत किमान ५ उमेदवार अंतिमतः निवडणूक लढविणे आवश्यक असेल. त्याचबरोबर जो राजकीय पक्ष या आदेशाच्या दिनांकानंतर नोंदणीकृत होईल, त्यांच्या नोंदणीच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीमध्ये त्या राजकीय पक्षाने राज्यात होणाऱ्या कोणत्याही एका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ग्रामपंचायत वगळून) सार्वत्रिक निवडणुकीत किमान ५ उमेदवार अंतिमतः निवडणूक लढविणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे ही अट त्या पुढील प्रत्येक ५ वर्षांसाठी (गट वर्षाप्रमाणे) कायमस्वरूपी लागू असेल. (अंतिमतः निवडणूक लढविणे, याचा अर्थ संबंधित राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी निवडणुकीसाठीचा आपला अर्ज मागे न घेता प्रत्यक्ष निवडणूक लढविणे असा समजण्यात यावा.)

९. **पक्षाच्या सदस्यांची यादी, कार्यकारिणी/ पदाधिकारी, पक्षाचे नाव किंवा पत्त्यातील बदलः**

(१) राजकीय पक्षाची आयोगाकडे नोंदणी झाल्यानंतर मूळ सदस्यांच्या यादीत भविष्यात काही बदल झाल्यास आवश्यक कागदपत्रांसह अद्ययावत यादी पक्षाच्या मुख्य कार्यालयात ठेवावी; तसेच त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सदस्य बदलाची नोंद घेऊन सदस्य यादी अद्ययावत ठेवावी. पक्षाचे किमान १५० सदस्य कायम असणे आवश्यक आहे. आयोगाने मागणी केल्यास सदस्यांची अद्ययावत यादी देणे अनिवार्य असेल.

(२) राजकीय पक्षाच्या कार्यकारणीत पदाधिकारी/ सदस्याचे निधन, राजीनामा किंवा पक्षांतर्गत निवडणूक इ. कारणांमुळे बदल झाल्यास, त्याबाबतचा अहवाल आयोगास विनाविलंब कळविणे आवश्यक असेल. असा अहवाल आयोगास सादर करताना पक्षाच्या सर्वसाधारण सभेमध्ये पक्षाच्या सदस्यांमधून व पक्षाच्या सदस्यांनी लोकशाही पद्धतीने नवीन कार्यकारिणी/ पदाधिकारी यांच्या निवडीबाबत मंजूर झालेल्या ठरावाची (सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीसह) नोटराईज्ड प्रत देणे अनिवार्य असेल.

(३) राजकीय पक्षाने त्याच्या मुख्य कार्यालयाच्या पत्यात बदल केल्यास, त्याबाबत आयोगास सूचित करताना परिच्छेद ३(५)(घ) व ३(५)(ङ) प्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य असेल. पत्त्यात बदलाबाबतच्या ठरावास पक्षाच्या सभेमध्ये मंजुरी घ्यावी लागेल. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे आणि जागा मालकाच्या ना- हरकत प्रमाणपत्रासह पत्त्यात बदल करण्याबाबत मंजूर झालेल्या ठरावाची (सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीसह) नोटराईज्ड प्रत आयोगास देणे अनिवार्य असेल.

(४) राजकीय पक्षाच्या संपर्क क्रमांकात किंवा ई-मेल आयडीत बदल झाल्यास तो विनाविलंब राज्य निवडणूक आयोगास कळवावा.

(५) राजकीय पक्षाची राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झाल्यानंतर पक्षाच्या नावात बदल करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव आयोगाकडे सादर करावा लागेल. आयोगाकडे तसा प्रस्ताव सादर करताना त्यासोबत पक्ष कार्यकारिणीच्या बैठकीत नाव बदलण्याबाबत मंजूर झालेल्या ठरावाची नोटराईज्ड प्रत आणि पक्षाच्या घटनेत नावासंदर्भातील कलमात बदल करून परिच्छेद ४(६) प्रमाणे पदाधिकाऱ्यांची स्वाक्षरी असलेली पक्षाच्या घटनेची सुधारित प्रत देणे आवश्यक राहील.

परंतु, असे नाव आयोगाकडून नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी रद्द झालेल्या पक्षांच्या नावाशी साधर्म्य असलेले असू नये.

( ६ ) राजकीय पक्षाकडून नाव बदलण्याबाबतचा विनंती प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्याच्या नावातील बदलाबाबत परिच्छेद ७( २ ) नुसार सर्वसाधारण जनतेकडून ३० दिवसांच्या मुदतीत हरकती मागविण्याबाबत अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. त्याचबरोबर संबंधित राजकीय पक्षाला परिच्छेद ७( ३ ) नुसार कार्यवाही करावी लागेल आणि त्यासाठी परिशिष्ट १०अ प्रमाणे जाहिरात प्रसिद्ध करावी लागेल.

( ७ ) राजकीय पक्षाचे नाव बदलण्यासंदर्भात परिच्छेद ९( ५ ) आणि ९( ६ ) नुसार कार्यवाही केल्यानंतर आयोग परिच्छेद ७( ५ ) आणि ९( ६ ) नुसार पक्षाचे नाव बदलण्यासंदर्भात परवानगी देण्याबाबतचा निर्णय घेईल.

( ८ ) भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अथवा मान्यताप्राप्त आणि ज्या पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडेही नोंदणी केलेली आहे, अशा राजकीय पक्षाच्या नावात अथवा निवडणूक चिन्हात कोणत्याही कारणास्तव बदल झाल्यास त्याची माहिती राज्य निवडणूक आयोगास त्वरित द्यावी, जेणेकरून आयोगास त्यावर उचित निर्णय घेता येईल.

परंतु, मान्यताप्राप्त पक्षाच्या नावात भारत निवडणूक आयोगाच्या मान्यतेने किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार बदल झाल्यास त्यासंदर्भात परिच्छेद ९( ५ ) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नसेल; परंतु बदलाबाबत राज्य निवडणूक आयोगास लेखी स्वरुपात अवगत करण्याची जबाबदारी संबंधित राजकीय पक्षाची असेल.

( ९ ) राजकीय पक्षाची नोंदणी झाल्यानंतर वेळोवेळी किंवा दरवर्षी करावयाची पूर्तता/ कार्यवाहीबाबतची माहिती परिशिष्ट- १२ मध्ये संक्षिप्त स्वरुपात दिली आहे; परंतु सविस्तर माहितीसाठी हा संपूर्ण आदेश व संबंधित परिच्छेद बारकाईने वाचणे आश्यक आहे.

**१०.   नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करणे:**

( १ ) या आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या आदेशातील तरतुदींन्वये नोंदणीकृत झालेल्या एखाद्या राजकीय पक्षांकडून,

( क ) या आदेशातील तरतुदींची विशेषतः परिच्छेद ८ मधील नमूद अटींची किंवा त्यापैकी कोणत्याही एका अटींची पूर्तता होत नसल्यास, किंवा

( ख ) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील आदर्श आचारसंहितेचे पालन होत नसल्यास, किंवा

( ग ) जनतेच्या हिताच्यादृष्टीने विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, निःपक्षपातीपणे व शांततेने पार पाडण्यासाठी आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन होत नसल्यास, किंवा

( घ ) आयोगाने मागणी केलेल्या कागदपत्रांची किंवा अन्य माहितीची पूर्तता होत नसल्यास, आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडून तसे सिद्ध झाल्यास, किंवा

( ङ ) राजकीय पक्षाची पाच वर्षांतून किमान एकदा पक्षाच्या सदस्यांमधून व पक्षाच्या सदस्यांकडून लोकशाही पद्धतीने पदाधिकारी/ कार्यकारिणीची निवडणूक न झाल्यास,

संबंधित राजकीय पक्षाची नोंदणी निलंबित किंवा कायमस्वरूपी रद्द करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला असतील.

( २ ) परिच्छेद १०( १ ) मधील बाबी तक्रारीद्वारे अथवा राज्य निवडणूक आयोगास स्वतःहून निदर्शनास आल्यास, अशा प्रकरणी सर्व उपलब्ध मुद्दे किंवा परिस्थितीचा विचार करून सदर पक्षाची नोंदणी निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकार आयोगास असेल. अशा प्रकरणी सबंधित राजकीय पक्षाला खुलासा करण्यासाठी पुरेशी संधी व अवधी दिला जाईल. आवश्यकतेनुसार सुनावणी घेण्यात येईल. अशा नैसर्गिक न्याय तत्वांच्या अवलंबनानंतरही कारणे/ खुलासा योग्य अथवा समर्थनीय न वाटल्यास, अशा पक्षांची नोंदणी रद्द करून त्या पक्षाचे नाव राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्षाच्या सूचीतून काढण्यात येईल.

( ३ ) राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत एखाद्या राजकीय पक्षास स्वतःहून पक्ष विसर्जित करता येईल किंवा अन्य राजकीय पक्षात विलिन करता येईल. त्यासाठी पक्षाने वार्षिक/ विशेष/ सर्वसाधारण सभेत दोन तृतीयांश बहुमताने तसा ठराव मंजूर करणे आवश्यक राहील.

( ४ ) वरील परिच्छेद १०( ३ ) प्रमाणे ठराव मंजूर झाल्यानंतर पक्षाची नोंदणी रद्द करण्यासाठी आयोगाकडे अर्ज सादर करावा लागेल. त्या अर्जासोबत तशा ठरावाची ( सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीसह ) नोटराईज्ड प्रत जोडणे अनिवार्य असेल.

( ५ ) तसा ठराव ( पक्ष विसर्जित करण्याबाबत ) मंजूर केल्याची आयोगाची खात्री पटल्यास, आयोग अशा पक्षाची नोंदणी रद्द करू शकेल.

( ६ ) कोणत्याही कारणास्तव राजकीय पक्षाची आयोगाने नोंदणी रद्द केल्यानंतर त्या राजकीय पक्षाची पुन्हा नोंदणी कायम करता येणार नाही किंवा त्याच नावाने नवा पक्ष नोंदविता येणार नाही,

## भाग चार

## निवडणूक चिन्ह आरक्षण व वाटप

**११. आरक्षित चिन्ह आणि मुक्त चिन्हेः**

( १ ) महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या आदेशातील तरतुदीनुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना, नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना आणि नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

( २ ) या आदेशातील चिन्हांची वर्गवारी खालीलप्रमाणे असेल.

(क) **'आरक्षित चिन्हे'** राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी आरक्षित असतील.

(ख) **'मुक्त चिन्हे'** राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार व अपक्ष उमेदवार यांच्यासाठी असतील.

(ग) **'तात्पुरते आरक्षित चिन्ह'** परिच्छेद १७ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी एक चिन्ह तात्पूरत्या स्वरुपात आरक्षित असेल.

**१२. नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षास आरक्षित चिन्हांचे वाटपः**

( १ ) राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी भारत निवडणूक आयोगाने त्या पक्षाकरिता आरक्षित केलेलेच चिन्ह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतसुद्धा आरक्षित असेल. अशा पक्षाच्या उमेदवारांना त्या चिन्हाची निवड करता येईल व त्यास त्या चिन्हाचे वाटप केले जाईल. अशा उमेदवारास इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

( २ ) जर महाराष्ट्र राज्याबाहेरील विविध राज्यांतील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांकरिता त्या त्या राज्यात भारत निवडणूक आयोगाने एकच समान चिन्ह आरक्षित केले असल्यास, अशा राज्यस्तरीय पक्षांपैकी ज्या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे प्रथम झाली आहे, त्या पक्षाला राज्य निवडणूक आयोग त्या आरक्षित चिन्हांचे वाटप करेल. त्यानंतर नोंदणी झालेल्या इतर राज्यस्तरीय पक्षांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हांव्यतिरिक्त परिच्छेद २३( १ )( ङ ) नुसार प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीतील एका चिन्हाची निवड करता येईल व ते चिन्ह राज्य निवडणूक आयोगाकडून त्या राजकीय पक्षासाठी आरक्षित करण्यात येईल आणि ते चिन्ह मुक्त चिन्हांच्या यादीतून वगळण्यात येईल.

परंतु असे की, एखाद्या राजकीय पक्षास भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता दिल्यास आणि तो पक्ष यापूर्वीच राज्य निवडणूक आयोगाकडे अमान्यताप्राप्त पक्ष म्हणून नोंदणीकृत असल्यास किंवा मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षाचा दर्जा मिळाल्यानंतर त्या पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यास, त्या पक्षासाठी राज्य निवडणूक आयोगाकडूनदेखील भारत निवडणूक आयोगाने आरक्षित केलेले चिन्ह प्राधान्याने आरक्षित करण्यात येईल; परंतु ते चिन्ह आणि राज्य निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी असलेल्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षाचेही चिन्ह समान असल्यास, महाराष्ट्रातील राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्षास ते चिन्ह प्राधान्याने देण्यात येईल. इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षास परिच्छेद २३( १ )( ङ ) नुसार प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीतील एका चिन्हाची निवड करावी लागेल व ते चिन्ह राज्य निवडणूक आयोगाकडून त्या राजकीय पक्षासाठी आरक्षित करण्यात येईल आणि ते चिन्ह मुक्त चिन्हांच्या यादीतून वगळण्यात येईल.

( ३ ) नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष/ इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढवित नसला तरी त्याच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हाची इतर कोणासही निवड करता येणार नाही किंवा त्या चिन्हांचे वाटप केले जाणार नाही.

( ४ ) जर मान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवाराने सादर केलेले नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी अवैध ठरले किंवा त्याने निवडणुकीतून माघार घेतली तर, पक्षाने दिलेल्या 'नमुना २-ब'/ 'जोडपत्र-२' मधील नमूद बदली उमेदवाराने त्या पक्षाने दिलेला 'नमुना २-अ' व 'नमुना २-ब'/ 'जोडपत्र-१' 'जोडपत्र-२' आणि पक्षाचा उमेदवार म्हणून नामनिर्देशनपत्र सादर केले असल्यास, त्या उमेदवारास त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात यावा.

**१३. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांबाबतः**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे उमेदवार व अपक्ष उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करताना परिच्छेद २३(१)(ङ) नुसार मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी जास्तीत जास्त कोणत्याही तीन चिन्हांची प्राधान्यक्रमानुसार मागणी करता येईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी हा राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप करेल.

(३) जर अनेक उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची निवड केली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी एक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल, इतर कोणासही देणार नाही.

(४) जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे असल्यास आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी फक्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकून (सोडतीद्वारे) निर्णय घेईल. ज्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्याने मागणी केलेल्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही.

(५) जर अशा निवडणुकीत अनेक अपक्ष उमेदवारांनी प्राधान्यक्रमानुसार एकाच मुक्त चिन्हाची निवड केली असल्यास संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यासाठी सोडत पद्धतीने निर्णय घेईल. ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल. या पद्धतीचा अवलंब करून व प्राधान्यक्रम विचारात घेऊन सर्व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

(६) प्राधान्यक्रम किंवा सोडतीनंतरही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमदेवारास चिन्ह वाटप होऊ न शकल्यास, मुक्त चिन्हांच्या सूचीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल त्या चिन्हाचे संबंधित उमेदवारास वाटप केले जाईल.

**१४. यथास्थिती महापौर व नगरपरिषद, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबतः**

(१) यथास्थिती महापौर किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरुवातीला महापौर/ अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. त्यांना वाटप केलेली चिन्हे मुक्त चिन्हांपैकी असल्यास त्या मुक्त चिन्हांचे वाटप सदस्यपदाच्या इतर कोणत्याही उमेदवारांना केले जाणार नाही.

परंतु, एखादा उमेदवार महापौर/ अध्यक्षपदासोबत सदस्यपदाची निवडणूक लढवत असल्यास, त्या उमेदवारास महापौर/ अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेले चिन्ह त्याने मागणी केल्यास, तो निवडणूक लढवत असलेल्या प्रभागांतील सदस्यपदांकरितादेखील देण्यात येईल.

**१५. बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीत (ग्रामपंचायत वगळून) चिन्ह वाटपः**

(१) परिच्छेद १३ मध्ये काहीही नमूद असले तरी बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीमध्ये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षांकडून निवडणूक लढवू इच्छिणारे उमेदवार व अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करताना प्रभागनिहाय चिन्हांचे वाटप होईल. एका प्रभागातील सर्व जागांकरिता चिन्हांचे वाटप एकाच वेळी सुरू होईल.

(२) एका प्रभागातील विविध जागांवर एकापेक्षा जास्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी प्राधान्यक्रमानुसार एकच चिन्ह मागितले असेल तर, त्या चिन्हाचे वाटप कोणत्या पक्षाच्या उमेदवारास करावे हे सोडत पद्धतीने निश्चित करण्यात येईल.

(क) त्यानुसार एखाद्या प्रभागात एखादे मुक्त चिन्ह एका नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास वाटप केल्यानंतर ते चिन्ह त्याच प्रभागातील अन्य जागेवरील त्याच राजकीय पक्षाच्या अन्य उमेदवारास नामनिर्देशनपत्रातील त्याच्या मागणीनुसार वाटप करता येईल. मात्र अन्य नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास अथवा अपक्ष उमेदवारास ते चिन्ह त्याच प्रभागात देता येणार नाही.

(ख) नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना चिन्ह वाटपानंतर अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप करताना एका प्रभागातील जागांवर प्राधान्यक्रमानुसार एकच चिन्ह एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांनी मागितले असल्यास त्या चिन्हाचे सोडतीद्वारे वाटप केले जाईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत एक चिन्ह एकाच प्रभागात एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांना दिले जाणार नाही.

**१६. मुक्त चिन्हे कमी पडल्यास:**

नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमेदवारांना मुक्त चिन्हे वाटप करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने परिच्छेद २३(१)(ङ) नुसार प्रसिद्ध केलेले मुक्त चिन्हे कमी पडत असतील तर अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी गरजेनुसार नवीन चिन्हांचा अंतर्भाव करून त्या चिन्हाचे उमेदवारांना वाटप करेल व तसे राज्य निवडणूक आयोगास कळवेल. मात्र राष्ट्रीय मानचिन्हे, पक्षी व प्राण्यांची चित्रे, धार्मिक प्रतीके इत्यादी चिन्हांचे उमेदवारांना वाटप करता येणार नाही; तसेच इतर राजकीय पक्षाच्या/ उमेदवारांच्या चिन्हाशी साधर्म्य असलेले चिन्ह कोणत्याही उमेदवारास दिले जाणार नाही.

**१७. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करणे:**

(१) एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत वेगवेगळ्या चिन्हांचे वाटप होते; परंतु जो नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष परिच्छेद १७(३) मधील अटींची पूर्तता करीत असल्यास आणि त्या पक्षाने विनंती अर्ज केल्यास परिच्छेद १७(२) मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जाहीर झालेल्या निवडणुकीसाठी त्या पक्षाकरिता मुक्त चिन्हापैकी एक चिन्ह तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करेल.

(२) उक्त परिच्छेद १७(१) मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा परिषद, नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी सक्षम प्राधिकारी 'जिल्हाधिकारी' असेल आणि महानगरपालिकांसाठी 'महानगरपालिका आयुक्त' असेल.

(३) एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने जर एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (पंचायत समिती वगळता) लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असतील किंवा त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण जागांच्या पाच टक्के जागा ह्या एका जागेपेक्षा कमी येत असतील तर किमान एका जागेवर त्या पक्षाचा उमेदवार विजयी झालेला असल्यास, त्या पक्षासाठी त्यांच्या विनंतीवरून त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जाहीर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुक्त चिन्हांपैकी एक चिन्ह तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित असल्याचे घोषित केले जाईल. त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्या मुक्त चिन्हाचे अन्य उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

परंतु, महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती व जिल्हा परिषदा या सर्व वेगवेगळ्या व स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था आहेत, म्हणून उक्त तरतूद त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेला स्वतंत्रपणे व तात्पुरत्या स्वरुपात लागू असेल.

(क) एखाद्या पंचायत समितीच्या लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असल्या तरी त्यासाठी हा परिच्छेद १७ लागू असणार नाही. मात्र संबंधित जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित करण्यात आलेले मुक्त चिन्ह त्या जिल्हा परिषद अंतर्गतच्या सर्व पंचायत समितीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीसाठीदेखील त्या राजकीय पक्षाकरिता तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित असेल. त्या चिन्हाचे वाटप त्या जिल्हा परिषदांतर्गतच्या पंचायत समितींच्या निवडणुकीत अन्य कुठल्याही उमेदवारास केले जाणार नाही.

(ख) स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पाच टक्के जागांची संख्या निश्चित करताना, ती जवळच्या पूर्णांक संख्येने पूर्णांकित केली जाईल. हे पाच टक्के निश्चित करताना, जर X.A मध्ये अपूर्णांक 'A' हा ०.५ पेक्षा कमी असेल; तर संख्या 'X' मानली पाहिजे आणि 'A' हा ०.५ च्या समान किंवा त्यापेक्षा जास्त अपूर्णांकांसाठी, X+१ ही संख्या विचारात घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत, या सूत्राद्वारे मिळवलेल्या जागांची संख्या १ पेक्षा कमी नसावी.

(४) एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एका निवडणुकीसाठी एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी परिच्छेद १७(३) नुसार तात्पुरत्या स्वरूपात चिन्ह आरक्षित केल्याचे घोषित करण्यात आले असल्यास, अशा पक्षाच्या उमेदवारांना त्याच्या पक्षाकरिता तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित केलेल्या मुक्त चिन्हाची निवड करावी लागेल. अशा उमेदवारांना संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित केलेले चिन्ह वाटप करेल.

(क) तात्पुरत्या स्वरूपात चिन्ह आरक्षित करण्यात आलेल्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षास व त्याच्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासंदर्भात पुढील परिच्छेद २० नुसार कार्यवाही करावी लागेल. अन्यथा त्या राजकीय पक्षाचा उमेदवार हा अपक्ष उमेदवार म्हणून समजण्यात येईल.

(५) तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करण्यासाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात होण्यापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवस आधी परिच्छेद १७(२) मध्ये विनिर्दिष्टीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे अनिवार्य राहील. सदर अर्जात मुक्त चिन्हांपैकी तीन चिन्हे प्राधान्य क्रमानुसार ठळकपणे नमूद करावी लागतील.

(६) सक्षम प्राधिकारी सदर अर्जावर नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात होण्याच्या १ दिवस आधी निर्णय घेईल व तात्काळ संबंधित राजकीय पक्षाला आणि सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवेल.

(७) तात्पुरत्या स्वरूपात चिन्ह आरक्षित करण्यासाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षास प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकांसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल.

(क) जर एकापेक्षा जास्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी विहित मुदतीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे एकच मुक्त चिन्ह तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करण्यासाठी अर्ज केल्यास व एकापेक्षा जास्त नोंदणीकृत राजकीय पक्ष, परिच्छेद १७(३) च्या तरतुदीप्रमाणे पात्र आढळल्यास, त्यापैकी ज्या राजकीय पक्षाने लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत जास्त जागा जिंकल्या असतील त्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी मागणी केलेले मुक्त चिन्ह सक्षम प्राधिकाऱ्याकडून तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करण्यात येईल.

परंतु, अशा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी जिंकलेल्या जागांची संख्या समान असल्यास, सक्षम प्राधिकारी सोडतीद्वारे निर्णय घेईल. ज्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या नावाची चिठ्ठी येईल, त्या राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात ते मुक्त चिन्ह आरक्षित करेल. उर्वरित नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी मुक्त चिन्हांच्या यादीमधून त्यांच्या मागणीनुसार एक चिन्ह तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित करेल.

(ख) सक्षम प्राधिकाऱ्याकडे करावयाच्या अर्जासोबत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मागील लगतच्या निवडणुकीत सदर पक्षातर्फे निवडून आलेल्या उमेदवारांची यादी जोडावी; तसेच अर्जासोबत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सचिवांचे/ संबंधित अधिकाऱ्याचे निवडून आलेल्या उमेदवारांबाबतचे प्रमाणपत्रही जोडावे.

(८) सक्षम प्राधिकारी सबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लगतच्या मागील निवडणुकीत संबंधित नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून निवडून आलेल्या उमेदवारांबाबत खात्री करेल.

परंतु, मागील लगतच्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांना त्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने त्यावेळी उमेदवारी दिलेली असणे अनिवार्य राहील. केवळ आज रोजी अर्ज करण्याच्या दिवशी सदर उमेदवार पक्षाचे सदस्य आहेत, म्हणून त्यांना मागील निवडणुकीत पक्षातर्फे निवडून आल्याचे समजले जाणार नाही.

(९) तात्पुरते आरक्षित घोषित झालेल्या चिन्हाबाबत,

(क) सक्षम प्राधिकारी ज्या मुक्त चिन्हास तात्पुरते आरक्षित चिन्ह घोषित करेल, ते चिन्ह संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी त्या निवडणुकीपुरते मुक्त चिन्हांच्या सूचीतून तात्पुरत्या स्वरुपात वगळल्याचे समजण्यात येईल.

(ख) असे तात्पुरते आरक्षित म्हणून घोषित केलेले मुक्त चिन्ह इतर कोणत्याही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा उमेदवारास त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या त्या निवडणुकीसाठी वाटपासाठी उपलब्ध असणार नाही.

(ग) घोषित करण्यात आलेले तात्पुरते आरक्षित चिन्ह सदर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पुढल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीसाठी मात्र मुक्त चिन्ह असेल. म्हणजे, तात्पुरत्या स्वरुपातील आरक्षित चिन्ह हे पाच वर्षे किंवा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची कुठल्याही कारणास्तव मुदत संपेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील. त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या आत पोटनिवडणूक झाल्यास त्यासाठीदेखील संबंधित पक्षाकरिता तात्पुरते आरक्षित चिन्ह कायम असेल.

**१८. उमेदवाराने चिन्हाची मागणी केलेली नसल्यासः**

(१) नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या किंवा तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करण्यात आलेल्या पक्षाच्या उमेदवाराने चिन्हाची मागणी केली नसली तरी त्याला जर अशा पक्षाने 'नमुना २-अ'/ 'नमुना २-ब'/ 'जोडपत्र-१'/ 'जोडपत्र-२' ही लेखी सूचनापत्रे दिली असल्यास, त्याला त्याच्याच पक्षाच्या आरक्षित चिन्हाचे वाटप केले जाईल. त्यास अन्य कुठलेही चिन्ह दिले जाणार नाही.

परंतु अशा उमेदवाराने अशा पक्षाच्या नावाने नामनिर्देशनपत्र दाखल केले असल्यास; परंतु पक्षाने उपरोक्त नमूद लेखीसूचनापत्रे दिली नसल्यास, अन्य सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर मुक्त चिन्हांच्या यादीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल ते चिन्ह त्यास देण्यात येईल.

(२) नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या किंवा अपक्ष उमेदवाराने चिन्हाची मागणी केली नसल्यास संबंधित प्रभागातील अन्य सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर अथवा महापौरपदाच्या थेट किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीसाठीच्या सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर मुक्त चिन्हांच्या यादीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल ते चिन्ह देण्यात येईल.

**१९. ग्रामपंचायत निवडणुकांसाठी उमेदवारांना चिन्ह वाटपः**

ग्रामपंचायतीच्या निवडणुका राजकीय पक्षविरहित पद्धतीने घेतल्या जातात. ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांतील थेट सरपंचपदासह सदस्यपदाच्या उमेदवारांसाठी परिच्छेद २३(१)(ङ) नुसार प्रसिद्ध केलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीतील मुक्त चिन्हांचेच वाटप केले जाईल. ग्रामपंचायत निवडणुकांसाठी चिन्ह वाटपाबाबत राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र आदेश लागू आहेत.

**२०. एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षाचा उमेदवार केव्हा समजले जाईलः**

(१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ उमेदवारास राजकीय पक्षाचा उमेदवार तेव्हा समजले जाईल जेव्हा,

(क) उमेदवाराने त्याबाबत नामनिर्देशनपत्रात तशी घोषणा केलेली असेल आणि,

(ख) ज्या राजकीय पक्षाच्या वतीने संबंधित उमेदवार निवडणूक लढविणार असेल, त्या उमेदवाराच्या नावाचे लेखी सूचनापत्र परिच्छेद २०(२) व २०(५) मध्ये नमूद केल्यानुसार त्या राजकीय पक्षाने संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त आणि निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांना मूळ प्रतीच्या स्वरुपात दिलेली असेल.

(२) **राजकीय पक्षाने द्यावयाचे लेखी सूचनापत्रः**

(क) **जिल्हा परिषद निवडणुकांबाबत**- जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी 'महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२' च्या 'नियम १५अ' नुसार विहित केलेले 'नमुना २-अ' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर नमुना २-ब' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे. ही लेखीसूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी व निर्वाचन अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

(ख) **पंचायत समिती निवडणुकांबाबत-** पंचायत समिती निर्वाचक गणाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ 'महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२' च्या 'नियम १५अ' नुसार विहित केलेले 'नमुना २-अ' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर 'नमुना २-ब' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे. ही लेखी सूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी व निर्वाचन अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

(ग) **महानगरपालिका निवडणुकांबाबत-** महानगरपालिका निवडणुकांदर्भात या आदेशान्वये विहित केलेले 'जोडपत्र-१' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर 'जोडपत्र-२' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे.

(एक) ही लेखी सूचनापत्रे बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरित सर्व महानगरपालिका निवडणुकांसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

(दोन) बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी ही लेखीसूचनापत्रे महानगरपालिका आयुक्त व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

(घ) **नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकांबाबत–** नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकांदर्भात या आदेशान्वये विहित केलेले 'जोडपत्र-१' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर 'जोडपत्र-२' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे. ही लेखी सूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

(३) राजकीय पक्षांनी विहित मुदतीत संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे 'नमुना २-अ' आणि 'जोडपत्र-१' सादर केले असल्यास, संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्या प्रती प्रमाणित करून ती लेखीसूचनापत्रे संबंधित निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी तात्काळ पाठवावेत.

(४) संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त आणि निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उक्त लेखी सूचनापत्र प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवार राजकीय पक्षाचे चिन्ह मिळविण्यास पात्र राहणार नाहीत.

(५) उक्त लेखी सूचनापत्रावर, राजकीय पक्षाचे अध्यक्ष/ सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्याने काळ्या/ निळ्या शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. प्रतिरूप स्वाक्षरी असलेले/ रबर स्टॅम्पची स्वाक्षरी असलेले किंवा अन्यप्रकारे स्वाक्षरी असलेले लेखी सूचनापत्र चालणार नाही; तसेच फॅक्सने/ ई-मेलद्वारे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे लेखी सूचनापत्र पाठविता येणार नाही. मूळ प्रतिशिवाय अन्य कुठल्याही प्रकारे पाठविलेली लेखीसूचनापत्रे जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त अथवा निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी स्वीकारणार नाहीत.

**२१. उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यासः**

(१) एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास व त्यामध्ये एकापेक्षा जास्त राजकीय पक्षाचा उमेदवार म्हणून घोषणा केली असल्यास; तसेच त्यासोबत एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांचे लेखी सूचनापत्र ('नमुना २-अ', 'नमुना २-ब', 'जोडपत्र- १' आणि 'जोडपत्र- २') विहित मुदतीत सादर केली असल्यास किंवा अपक्ष उमेदवार म्हणून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास, पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबविली जाईल-

(क) एकाच उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांचे लेखी सूचनापत्र दाखल केले असल्यास नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत अशा उमेदवाराच्या बाबतीत एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षांनी लेखी कळवून त्यांच्यासाठी दिलेले 'नमुना २-ब' अथवा 'जोडपत्र-२' मागे घेतले असल्यास त्या उमेदवारास ज्या पक्षाने 'नमुना २-ब' अथवा 'जोडपत्र-२' मागे घेतलेले नाही, त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे समजण्यात येईल.

(ख) जर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेला 'नमुना२-ब' अथवा 'जोडपत्र-२' शिल्लक राहिले असल्यास, त्या उमेदवाराने तो कोणत्या राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी कळविल्यास, त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे समजण्यात येईल.

(ग) जर उक्त परिच्छेद २१(१)(ख) मध्ये नमूद केल्याप्रमाणे एखाद्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी न कळविल्यास त्याने प्रथम ज्या पक्षाच्या वतीने नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या राजकीय पक्षाचा तो अधिकृत उमेदवार आहे, असे समजण्यात येईल.

(२) एखाद्या उमेदवाराने अपक्ष उमेदवार म्हणून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास चिन्ह वाटप करताना त्याने प्रथम दाखल केलेल्या वैध नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेऊन चिन्ह वाटप करण्यात येईल.

**२२. राजकीय पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखी सूचनापत्र दिले असल्यासः**

एकाच राजकीय पक्षाने एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक उमेदवारांना पक्षाचे लेखी सूचनापत्र ('नमुना २-ब', 'जोडपत्र २') दिले असल्यास, त्यावेळी जर त्या पक्षाने नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० (बृहन्मुंबईसाठी सायंकाळी ५.००) वाजेपर्यंत नेमक्या कोणत्या उमेदवाराला पक्षाची उमेदवारी द्यावयाची आहे, असे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास लेखी कळविले असल्यास त्या उमेदवारास त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल. जर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत लेखी कळविले नसल्यास ज्या उमेदवाराने सर्वप्रथम नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्यालाच पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल.

**२३. राजकीय पक्षांची व चिन्हांची सूची; तसेच मुक्त चिन्हांची सूची असलेली अधिसूचनाः**

(१) **शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या एका किंवा अधिक अधिसूचनांद्वारे राज्य निवडणूक आयोग खालील माहिती (सूची) विनिर्दिष्टित करेल-

(क) आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांचा तपशील व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे

(ख) आयोगाकडील महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांचा तपशील व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(ग) आयोगाकडील नोंदणीकृत इतर राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांचा तपशील व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(घ) आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचा तपशील.

(ड़) मुक्त चिन्हे.

## भाग पाच

## राजकीय पक्षांना प्राप्त होणारा निधी व पक्षांकडून होणारा खर्च

**२४. राजकीय पक्षांना प्राप्त होणारा निधीः**

(१) राजकीय पक्षाला एका आर्थिक वर्षात कोणतीही व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींकडून प्राप्त होणारा रोख निधी अथवा देणगीचा स्वीकार किंवा विनियोग आयकर कायद्यातील तरतुदीनुसार करावा.

(२) पक्षाला एका आर्थिक वर्षात कोणतीही व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींकडून देणगी/ निधी रोख स्वरूपात किंवा धनादेश, धनाकर्ष, ऑनलाईन अथवा भेट/ देणगी इ. प्राप्त झालेल्याच्या नोंदी पक्षाने आपल्या स्तरावर ठेवाव्यात. त्याची नोंद परिच्छेद ८(३) मध्ये नमूद वार्षिक लेखापरिक्षित लेख्यात घ्यावी. सदर कागदपत्रांची राज्य निवडणूक आयोगाने मागणी केल्यास राजकीय पक्षांना ती सादर करणे आवश्यक राहील.

**२५. राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये करण्यात येणारा खर्चः**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष आणि नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केलेला खर्च हा आयोगाच्या निर्देशानुसार (निश्चित केलेल्या मर्यादेत) असायला हवा; तसेच राजकीय पक्षाने आपल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी केलेला थेट खर्च हा त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित उमेदवाराच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये खालील परिच्छेद २५(१)(क) प्रमाणे दर्शविण्यात यावा अथवा एकापेक्षा जास्त उमेदवारांवर एकत्रित खर्च केला असल्यास तो त्या उमेदवारांमध्ये खालील परिच्छेद २५(१)(ख) प्रमाणे समप्रमाणात विभागण्यात यावा.

(क) **उमेदवारावर केलेला थेट खर्चः** उदा. उमेदवाराला दिलेला पक्ष निधी, उमेदवारासाठी छापलेले प्रचार साहित्य, उमेदवाराला पुरविलेली वाहने इ. ज्याचा संबंध त्या उमेदवाराशी थेट जोडता येतो, तो खर्च त्या उमेदवारांच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

(ख) **उमेदवारांमध्ये विभाजित करता येणारा खर्च**: उदा. राजकीय पक्षाने घेतलेली जाहीर सभा/ रॅली, पोस्टर्स/ बॅनर्स, जाहिराती, प्रचारफेरी, रोड शो इ. ज्यामुळे एकापेक्षा अधिक उमेदवारांचा प्रचार होतो, असा खर्च त्या सर्व उमेदवारांमध्ये समप्रमाणात विभाजित करण्यात यावा. हा खर्च त्या उमेदवारांच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

(२) सर्व व्यवहार धनादेशाद्वारे (Cheque) अथवा ऑनलाईन पध्दतीने करावेत. रोखीने करावयाचे व्यवहार प्राप्तीकर कायद्यातील तरतुदी आणि मर्यादेनुसार असावेत. अशा सर्व व्यवहारांची देयके, व्हॉऊचर्स, पावत्या इत्यादी राजकीय पक्षाने जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांची राज्य निवडणूक आयोग किंवा आयोगाने प्राधिकृत केलेला अधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयाकडून मागणी झाल्यास, राजकीय पक्षांना ती सादर करणे आवश्यक राहील.

(३) उमेदवारांमध्ये विभागून देण्यात आलेला खर्च टप्प्याटप्याने पुढील वेळापत्रकानुसार संबंधित राजकीय पक्षाने त्यांच्या उमेदवारांना लेखी स्वरुपात कळवावा,

(क) पहिल्या टप्प्याचा खर्च नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम तारखेपर्यंत.

(ख) दुसऱ्या टप्प्याचा खर्च मतमोजणीच्या तारखेपर्यंत.

(ग) तिसऱ्या टप्प्याचा व अंतिम एकूण खर्च निवडणूक निकाल लागल्यानंतर १० दिवसांपर्यंत.

(४) राजकीय पक्षाने त्यांच्या उमेदवारांमध्ये विभागून दिलेला खर्च त्या उमेदवारांनी, त्यांच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये दर्शविणे बंधनकारक आहे.

**२६. 'प्रमुख प्रचारक' (Star Campaigner) आणि त्यांचा खर्च:**

(१) निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या 'प्रमुख प्रचारकांची' (Star Campaigners) यादी महानगरपालिका निवडणुकीसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त; तसेच नगरपरिषद/ नगरपंचायती आणि जिल्हा परिषदा/ पंचायत समिती निवडणुकीसाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावी.

(२) सर्वसाधारणतः सर्व राजकीय पक्षांना २० प्रमुख प्रचारकांची यादी सादर करता येईल. राज्य निवडणूक आयोगास प्रमुख प्रचारकांच्या संख्येत परिस्थितीनुरूप बदल करण्याचा अधिकार असेल.

(३) राजकीय पक्षांच्या प्रमुख प्रचारकांचा निवडणुकीच्या प्रचाराकरिता जाण्याचा आणि परतीच्या प्रवासाच्या खर्चास संबंधित उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये समावेश करण्यापासून सूट असेल.

(४) परंतु, कोणत्याही उमेदवारास स्वतःच्या मतदारसंघामध्ये (प्रभाग, निवडणूक विभाग, निर्वाचक गण इ.) स्वतःचे नाव प्रमुख प्रचारक म्हणून घोषित करता येणार नाही. प्रत्येक उमेदवाराने त्याच्या स्वतःच्या मतदारसंघामध्ये (प्रभाग, निवडणूक विभाग, निर्वाचक गण इ.) प्रचाराकरिता केलेल्या सर्व प्रवासखर्चाचा समावेश त्याच्या निवडणूक खर्चात होईल.

## भाग सहा

## संकीर्ण

**२७. सूचना देण्याबाबत आयोगाचे अधिकार:**

(१) संविधानिक जबाबदारी योग्यरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोग खालील बाबतीत सूचना व निर्देश देऊ शकेल-

(क) या आदेशातील कोणत्याही तरतुदींबाबतच्या स्पष्टीकरणाकरिता;

(ख) अशा कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी अथवा संभ्रम दूर करण्याकरिता;

(ग) राजकीय पक्षांची नोंदणी, निवडणूक चिन्ह आरक्षण व वाटप, राजकीय पक्षाला प्राप्त होणारा निधी व निवडणुकीसाठी किंवा उमेदवारावर राजकीय पक्षाने केलेला खर्च, यासंबंधात या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल तेव्हा त्यासंबंधात योग्य ती तरतूद करणे, आणि निवडणुका सुरळीत व सुव्यवस्थित पार पाडण्याच्यादृष्टीने योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत झाल्यास.

(२) राज्य निवडणूक आयोग संबंधित राजकीय पक्षासंदर्भातील अधिकची माहिती/ तपशील/ कागदपत्रे आवश्यतेनुसार मागू शकेल.

(३) राजकीय पक्षांना पक्ष नोंदणीच्या वेळी किंवा नोंदणी झाल्यानंतरही वेळोवेळी आवश्यकतेनुसार मागितलेली मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील.

(४) राज्य निवडणूक आयोगाशी पत्रव्यवहार करताना राजकीय पक्षांनी प्रत्येक वेळी आपला कायम नोंदणी क्रमांक (PRN) व नोंदणी दिनांक संदर्भ म्हणून नमूद करावा.

(५) राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत सर्व राजकीय पक्षांना या आदेशातील तरतुदी आणि या पुढे वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा/ बदल लागू असतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

**सुरेश काकाणी,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

## परिशिष्ट- १

### राजकीय पक्ष नोंदणीसाठीच्या अर्जाचे प्रारूप

( भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी )

[कृपया परिच्छेद ३(१)(क) पहावा]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

आमचा............................................... हा राजकीय पक्ष भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत/ मान्यताप्राप्त पक्ष असून, या पक्षाच्या वतीने मी श्री/ श्रीमती............................................... 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५' अन्वये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती करित आहे. सदर आदेशान्वये आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेः

| अ. क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | राजकीय पक्षाचे नाव *(मराठीत)*: | |
| २. | Name of Political Party *(In English)*: | |
| ३. | पक्ष स्थापनेच्या ठरावाचा दिनांक: | |
| ४. | भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणी क्रमांक आणि दिनांक: | |
| ५. | मान्यताप्राप्त असल्यास त्याबाबतचे आदेश आणि निवडणूक चिन्हाचा तपशील: | |
| ६. | पक्षाच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता *(मराठीत)*: | |
| ७. | Address of headquarters of Political Party *(In English)*: | |
| ८. | पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा पत्ता *(मराठीत)*: | |
| ९. | Address of state headquarters of Political Party *(In English)*: | |
| १०. | संपर्कासाठी पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक: | |
| ११. | संपर्कासाठी पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा ई-मेल आयडी *(पक्षाच्या नावे असावा)*: | |

| अ. क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १२. | पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचे नाव: | |
| १३. | पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा पत्ता: | |
| १४. | पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षाचे नाव: | |
| १५. | पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षाचा पत्ता: | |
| १६. | परिशिष्ट-३ मध्ये नमूद घोषणापत्र जोडले आहे का? | |
| १७. | किमान १५० सदस्यांची नावे व मतदार यादीतील त्यांच्या नावाबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील/ उतारा जोडला आहे का? *(केवळ इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांसाठी) [परिच्छेद ३(५)(झ) कृपया पहावा]* | |
| १८. | महाराष्ट्र राज्यातील किमान १५० पक्ष सदस्यांच्या मतदान ओळखपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती जोडल्या आहेत का? *(केवळ इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांसाठी) [परिच्छेद ३(५)(ट) कृपया पहावा]* | |
| १९. | पक्षाच्या पाच पदाधिकाऱ्यांची पदनामासह सही असलेली पक्षाची घटना जोडली आहे का? | |
| २०. | पक्षाच्या घटनेत या आदेशाच्या परिच्छेद ४ प्रमाणे सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख आहे का? | |
| २१. | पक्षाची राज्य कार्यकारिणी/ पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा ठराव, घटना मंजुरीची/ स्वीकारल्याच्या ठरावाची नोटराईझ्ड प्रत जोडली आहे? *[परिच्छेद ३(५)(च) कृपया पहावा]* | |
| २२. | पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयाची जागा/ इमारत मालकाचे परिशिष्ट- ४ नुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(घ) कृपया पहावा]* | |
| २३ | परिशिष्ट- ५ नुसार राजकीय पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयासंदर्भात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(ङ) कृपया पहावा]* | |
| २४. | प्रक्रिया शुल्क धनाकर्ष/ ऑनलाईनद्वारे भरल्याचा तपशील *(रक्कम, बँकेचे नाव, दिनांक, क्रमांक, इ.) [परिच्छेद ६(१) कृपया पहावा]* | |

या अर्जासोबत दिलेली सर्व माहिती व तपशील खरा असून, तो सर्व सदस्यांच्या संमतीने देण्यात येत आहे. त्याबद्दल काही वाद उद्‌भवल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार असेल. नोंदणी शुल्कापोटी एकदा जमा केलेली रक्कम कुठल्याही कारणास्तव परत मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

**दिनांक:......................**

**ठिकाण:.....................**

आपला/ आपली विश्वासू

(सही)

(पक्ष अध्यक्ष/सचिवाचे नाव-...................................)

(पक्षाचे नाव-...................................)

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

## परिशिष्ट- २

### राजकीय पक्ष नोंदणीसाठीच्या अर्जाचे प्रारूप

( नव्याने नोंदणी करू इच्छिणाऱ्या राजकीय पक्षांसाठी )

[कृपया परिच्छेद ३( १ )( ख ) पहावा]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.

महोदय,

........................................................................................ ( प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव ) वतीने मी श्री/ श्रीमती...................................................... 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५' अन्वये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती करत आहे. सदर आदेशान्वये आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेः

| **अ. क्र.** | **बाब** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | राजकीय पक्षाचे नाव *(मराठीत)*: | |
| २. | Name of Political Party *(In English)*: | |
| ३. | पक्ष स्थापनेच्या ठरावाचा दिनांक: | |
| ४. | पक्षाच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता *(मराठीत)*: | |
| ५. | Address of headquarters of Political Party *(In English)*: | |
| ६. | संपर्कासाठी पक्षाचा दूरध्वनी क्रमांक: | |
| ७. | संपर्कासाठी पक्षाचा ई-मेल आयडी *(पक्षाच्या नावाचा)*: | |
| ८. | पक्ष अध्यक्षाचे नाव: | |
| ९. | पक्ष अध्यक्षाचा पत्ता: | |
| १०. | परिशिष्ट-३ मध्ये नमूद घोषणापत्र जोडले आहे का? | |
| ११. | पक्षाच्या पाच पदाधिकाऱ्यांची सही असलेली पक्षाची घटना जोडली आहे का? | |
| १२. | पक्षाच्या घटनेत या आदेशाच्या परिच्छेद ४ प्रमाणे सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख आहे का? | |

| अ. क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १३. | पक्ष स्थापना, कार्यकारिणी/पदाधिकाऱ्यांची निवड, पक्ष घटना इ. बाबतच्या ठरावाची नोटराईज्ड प्रत जोडली आहे का? *[परिच्छेद ३(५)(च) कृपया पहावा]* | |
| १४. | किमान १५० सदस्यांची नावे व मतदार यादीतील त्यांच्या नावाबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील/ उतारा जोडला आहे का? *[परिच्छेद ३(५)(झ) कृपया पहावा]* | |
| १५. | किमान १५० सदस्यांच्या मतदान ओळखपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती जोडल्या आहेत का? *[परिच्छेद ३(५)(ट) कृपया पहावा]* | |
| १६. | राजकीय पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयाच्या जागा/ इमारत मालकाचे परिशिष्ट-४ नुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(घ) कृपया पहावा]* | |
| १७. | राजकीय पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयासंदर्भात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे परिशिष्ट-५ नुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(ङ) कृपया पहावा]* | |
| १८. | प्रक्रिया शुल्काच्या धनाकर्षाचा/ ऑनलाईन भरल्याचा तपशील (रक्कम, बँकेचे नाव, दिनांक, क्रमांक, इ.) *[परिच्छेद ६(१) कृपया पहावा]* | |

या अर्जासोबत दिलेली माहिती व तपशील खरा असून, तो सर्व सदस्यांच्या संमतीने देण्यात येत आहे. त्याबद्दल काही वाद उद्‌भवल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार असेल.

**दिनांकः** …………………………….
**स्थळः** ……………………………….

आपला/ आपली विश्वासू

(सही)
पक्ष अध्यक्ष/ सचिवाचे नाव-……………………………….)
(पक्षाचे नाव-……………………………….)

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

## परिशिष्ट- ३

### घोषणापत्र

[कृपया परिच्छेद ३( ३ ) पहावा, सदर घोषणापत्र नोटराईज्ड केलेले असावे]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

मी .............................. ( अर्जदाराचे नाव ) ............................. या राजकीय पक्षाच्या वतीने घोषणा करतो/ करते की, ‘महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५’ यातील सर्व तरतुदींचे वाचन केले असून, ते मला समजले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त पक्ष राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडून नोंदणीकृत झाल्यास, सदर पक्ष-

( १ ) भारतीय संविधानावर दृढ विश्वास, निष्ठा राखून आणि समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही, भारतीय सार्वभौमत्व, एकता व एकात्मता या तत्वांना बांधिल राहील;

( २ ) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वेळोवेळी आदर्श आचारसंहितेसंदर्भात दिलेल्या किंवा देण्यात येणाऱ्या आदेशांचे आणि ‘महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५’ यातील तरतुदींचे पालन करील;

( ३ ) निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक वातवरणात पार पाडण्यासाठी आणि सर्वसाधारण जनतेच्या व विशेषतः निवडणूक क्षेत्राच्या हिताच्यादृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन करील;

( ४ ) पक्षाच्या नावामधील बदल, मुख्य कार्यालय/ राज्यस्तरीय कार्यालयाचा पत्ता, पक्षाच्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील पदाधिकाऱ्यांची नावे किंवा इतर कोणताही बदल विनाविलंब आयोगाला कळवेल; परंतु पक्षाच्या नावामधील बदल करण्यापूर्वी पक्ष राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेईल;

( ५ ) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची नावे आयोग व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांची नावे व सहीचा नमुना संबंधितास कळवेल.

मी असेही घोषित करतो/ करते की, या घोषणापत्रातील मजकूर; तसेच राजकीय पक्ष नोंदणीसाठी दिलेल्या अर्जातील तपशील व सोबतची कागदपत्रे माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहेत. यातील कोणताही भाग खोटा नसून, आयोगापासून कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती/ माहिती लपविण्यात आलेली नाही.

**दिनांकः ..................................**
**स्थळः ..................................**

आपला/ आपली विश्वासू

( सही )
( पक्ष अध्यक्ष/सचिवाचे नाव-...................... )
( पक्षाचे नाव-.................................... )

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप ) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

## परिशिष्ट- ४

## राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयाच्या जागा/इमारत मालकाचे 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा नमुना

( पक्ष नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करताना किंवा पक्षाच्या मुख्य कार्यालयात बदल झाल्यास
पक्ष कार्यालयाच्या जागा मालकाचे द्यावयाच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा विहित नमुना )
[कृपया परिच्छेद ३(५)(घ) पहावा, सदर 'ना हरकत प्रमाणपत्र' नोटराईज्ड केलेले असावे]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

मी/ आम्ही ---------------------------------- राहणार ------------------------------------- याद्वारे असे जाहीर करतो/ करते की, माझ्या/ आमच्या मालकीची ------------------------------------------------- ही जागा मी/ आम्ही------------------------------------------------ या राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयासाठी वापरण्याकरिता देत आहे/आहोत. यासंदर्भात काही वादविवाद झाल्यास किंवा कायदेशीर प्रश्न उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी/ आमची राहील, याची जाणीव ठेवून सदर जागेबाबत 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात येत आहे.

**दिनांकः ……………………………**
**स्थळः ………………………………**

आपला/ आपली विश्वासू

( जागा मालकाची सही )

***टिप*** *: राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयासाठी देण्यात येणारी जागा संबंधित मालकाची असल्यासंदर्भातील पुरावा या आदेशाच्या परिच्छेद ३(५)(घ) नुसार सादर करणे आवश्यक आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि जागा मालकाच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'वरील पत्ता अचूक आणि एकसमान असणे आवश्यक आहे.*

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षणऽ व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

**परिशिष्ट- ५**

**स्थानिक स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा नमुना**

(संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेटरहेडवर घेणे)

पक्ष नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करताना त्यासोबत जोडावयाच्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा विहित नमुना

[कृपया परिच्छेद ३(५)(ङ) पहावा]

**जावक क्रमांक:** ---------------------
**दिनांक:** -----------------------------

**प्रति,**
श्री./श्रीमती--------------------
अध्यक्ष/सचिव/सरचिटणीस,
---------------------------- (प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव व कार्यालयाचा संपूर्ण पत्ता)

